परिक्षा अत्यंत महत्वाचे कालमर्यादा परिक्षा दिनांक १९ व २३ जुलै २०२४

जा.क्र.जिप.साप्रवि/परिक्षा२०२३/ 3134 /२४

सामान्य प्रशासन विभाग जि प अमरावती

दिनांक :- १८/७/२०२४

प्रति,

गट विकास अधिकारी पंचायत समिती ---------------------- सर्व

वैद्यकिय अधिकारी प्रा आ केन्द्र ----------------- पंचायत समिती --------------- सर्व

मुख्याध्यापक जि प प्राथमिक शाळा ------------------------पंचायत समिती -------सर्व

सचिव ग्रामपंचायत -------------------- पंचायत समिती ---------------सर्व

विषय :- आरोग्य सेवक (महिला) ( आरोग्य परिचारिका) या पदाकरिता परिक्षा देण्या-या विद्यार्थाना परिक्षा केन्द्रावर ओळख पटविण्यांकरिता महत्वाच्या सुचना (विवाहीत महिला करिता विशेष सुचना)

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये जिल्हा परिषद भरती प्रक्रीया २०२३ मध्ये पदभरती जाहीरात देण्यांत आलेली होती करिता आरोग्य सेवक (महिला) (आरोग्य परिचारिका) या पदाची परिक्षा दिनांक १९ व २३ जुलै २०२४ रोजी आहे . करिता हयापुर्वीचा अनुभव लक्षात येता ज्या विवाहीत महिला यांनी त्यांचे अर्ज विवाहा नंतरच्या नावाने अर्ज भरलेला अश्या महिला उमेदवारांना कडे परिक्षा ओळखपत्रावरील नांवाचे कोणतेच ओळखपत्र नसल्यामुळे त्यांना परिक्षा केन्द्रावर प्रवेश देण्यांत येत नाही करिता जाहीरात व ओळखपत्र मध्ये सविस्तर सुचना दिलेल्या आहे तसेच संबधीत उमेदवारास ई मेल सुध्दा करण्यांत आलेले आहे परंतू उमेदवाराने सुचना न वाचल्यामुळे उमेदवार परिक्षा पासून वंचित राहणार नाही याकरिता आपण कार्यरत असलेल्या गांवमधील व ओळखीच्या उमेदवार परिक्षेला असल्यास खालील प्रमाणे जाहीरातमधील सुचना प्रमाणे ओळखपत्र परिक्षा केन्द्रावर आणण्याबाबत माहिती देण्यांत यावी.

4.6 **ओळख पटवणे**

१. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहित ओळखपत्र / बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमदेवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

टिप - उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. **ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.**

२. परीक्षेला उशिरा येण्याबाबत - परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनिटे) असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

३. निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करण्यात येणारी कार्यवाही -

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती कायदेशीर कार्यवाई करण्यात येईल.

Sanjita

संजिता मोहपात्रा भा.प्र.से

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद अमरावती

Scanned with OKEN Scanner